The Maharaja Sayajirao University of Baroda
Vadodara

**SYNOPSIS:**

For the Degree of Ph.D. in the subject of Marathi

Title of the Thesis:

# "Dangi Loksahitya ani Sanskruti: Ek Abhyas"

Research Scholar
**Gaikwad Girish Yashwant**
MA, NET-(JRF), SET

**Supervisor:**
Dr. Sanjaykumar Karandikar
Professor & Head
Department of Marathi
Faculty of Arts
The Maharaja Sayajirao University of Baroda
Vadodara- 390002

मराठी विभाग, फॅकल्टी ऑफ आर्टस्

**महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा**

सयाजीगंज, वडोदरा ( गुजरात )

मराठी विषयातील पीएच.डी. पदवीकरीता सादर केलेल्या प्रबंधाचा अंतिम शोध-सारांश

-: शीर्षक :-

# “डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती: एक अभ्यास”

अभ्यासक

**गायकवाड गिरीष यशवंत**

एम.ए., नेट (जे.आर.एफ.), सेट

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर**

प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, फॅकल्टी ऑफ आर्टस्

महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा

# डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती: एक अभ्यास

**प्रास्ताविक:**

आपल्या देशात प्रादेशिक विविधतेनुसार वेगवेगळया बोलीभाषा बोलल्या जातात. या वेगवेगळया बोलीभाषांमध्ये वेगवेगळे लोकवाङ्मय प्रकार आढळून येतात. लोकांनी लोकांसाठी स्वतःच्या अंतप्रेरणेने निर्माण केलेले मौखिक स्वरूपातील साहित्य ते लोकसाहित्य असे आपणास म्हणता येते.

लोकसाहित्याची एकच एक निर्विवाद, निर्दोष आणि सर्वसमावेशक अशी व्याख्या कोणत्याही लोकसाहित्य अभ्यासकाला करता आल्याचे आढळत नाही. लोकसाहित्याची व्याप्ती खूप मोठी असल्याने हा संभ्रम लोकसाहित्य तज्ज्ञांमध्ये आढळतो. असे असले तरी या सगळयांनी आपापल्या परीने लोकसाहित्याचे महत्त्व, लोकसाहित्याची गरज, लोकसाहित्याचे वेगळेपण, लोकसाहित्याची वैशिष्ट्ये, लोकसाहित्याचा समाजजीवनातील उपयोग, लोकसाहित्याचा इतिहास इत्यादी वेगवेगळया दृष्टींनी समाजाला महत्त्व पटवून दिले आहे.

“जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या जाती-जमातींची नवी पिढी जुने संस्कार सोडून नवे बदलते जीवन झपाट्याने स्वीकारत आहे. बदलता निसर्ग, नष्ट होणारी जंगले, आधुनिक तंत्रज्ञान आणि शहरांचे आकर्षण यामुळे हे तरुण आता महानगरांकडे धाव घेऊ लागले आहेत. त्यामुळे त्यांच्या पुढच्या पिढीला आपल्या पूर्वजांच्या जीवनरूढी सांगता येणार नाहीत, आणि पिढ्यांपिढ्या चालत आलेला हा वैविध्यपूर्ण बोलीभाषांचा, वैविध्यपूर्ण संस्कृतीचा ठेवा नाहीसा होऊन जाईल. आदिवासीच नव्हे तर समाजातील सर्वच घटक मानवी संस्कृतीचा अमूल्य ठेवा हरवून बसण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तसे होऊ नये म्हणून वेळीच लोकसाहित्याच्या रूपाने अक्षरबद्ध करून त्याला चीरकालीत्व देणे गरजेचे आहे.

लोकसाहित्याच्या माध्यमातून तत्कालीन जीवनदर्शन, रिती-भाती, सण-उत्सव, कुटुंबातील नातेसंबंध, उपजीविकेची साधने, खाण-पाण, प्राणी व देवदेवताविषयक कल्पनाबंध, तत्कालीन समाजस्थिती व परंपरा दर्शन, वीर पुरुषांचे चित्रण, भाषा-बोलीभाषा, व्यक्त झालेली ग्रामदैवते, वाद्य, आयुध, सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन, अशुभ निवारण इत्यादी विशेष नोंदविता येतात.

प्रस्तुत प्रबंधातील लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, लोकश्रद्धा, लोकविद्या, लोकभ्रम, अनेक चालीरीती इत्यादींच्या माध्यमातून संशोधकाने समग्र डांगी लोकसंस्कृतीचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय निवडीमागील भूमिका:**

१) मराठी लोकसाहित्याचा विचार करता डांगी लोकसाहित्य हा त्याचाच एक अमूल्य असा भाग असून त्याकडे मात्र मराठी अभ्यासकांचे आजतागायत दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. याचे कारण डांग हा भूप्रदेश आज गुजरातमध्ये स्थित आहे. तिथली शैक्षणिक भाषा ही गुजराती आहे. म्हणून मराठी भाषिक अभ्यासक डांग भागाकडे दुर्लक्ष करतांना दिसून येतो. तरीही महाराष्ट्रीयन मराठी अभ्यासक ओरडून ओरडून सांगतात, की डांगी ही मराठीचीच एक बोली आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र या बोलीविषयी कोणी अभ्यास करतांना दिसत नाही. म्हणून मला या डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

२) माझे आजोळ आणि बालपण डांग जिल्ह्यातील असल्याने डांगी आदिवासींशी आलेला सबंध व परिचय मला 'डांगी लोकसाहित्य आणि संस्कृती' या विषयाकडे अधिक चिकित्सकपणे पाहायला लावतो. येथील सण-उत्सव, रिती-भाती, खाण-पाण, राहणीमान, नाते सबंध, पोषाख, दाग दागिने, शिकार, वन्य प्राणी, दैनंदिन व्यवहार, बोली भाषा आणि एकूणच डांगी आदिवासी जीवनाचा स्वानुभव घेत असल्याने त्यातील वाटणारी रुची या अभ्यासास सहाय्यक झाली आहे.

३) लोकसाहित्याच्या मूळ वारसदारांचा शोध घेतांना भिल्ल, कोरकू, ठाकर, कोलाम, माडिया, गोंड, आंध, नागा, वारली त्याचबरोबर कोकणा इत्यादी जमातीतील पारंपरिक जीवन जगणारे लोक हेच लोकसाहित्याचे खरे वारसदार आहेत असे म्हटले जाते. वरीलपैकी मीही कोकणा या जमातीचा आहे. त्याचाच एक अंश म्हणून हा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

४) डांगी आदिवासी जनता ही गरीब, अशिक्षित असल्याने समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्याचे दिसून येते. त्यांनी त्यांची आगळी वेगळी अशी संस्कृती आजतागायत टिकवून ठेवली आहे. परंतु ती तशीच टिकून राहील याची काही शाश्वती दिसत नाही. अशा मौलिक संस्कृतीला अक्षरबद्ध करून टिकवून ठेवणे आणि समाजातील मुख्य प्रवाहात आणणे अशी यामागची माझी भूमिका आहे.

५) लोकसाहित्याचा ठेवा प्रामुख्याने ग्रामीण भागातील किंवा डोंगर कपारीतील आदिवासींकडे पाहायला मिळतो. परंतु आदिवासी सांगितले की तो मागासलेला, गावंढळ, गलीच्च, अशिक्षित, असंस्कृत, अविचारी, अजाण, काहीही येत नसलेला अशा कितीतरी दृष्टींनी त्याकडे पाहिले जाते. यातील काही गोष्टी काही अंशी खऱ्याही असतील परंतु बारकाईने विचार केला तर त्याकडे जे अप्रतिम, मौल्यवान असे जे लोकसाहित्याचे धन आहे ते इतर पुढारलेल्या लोकांकडे मिळणे शक्य नाही. म्हणून

मी या तळागाळातील आदिवासींपर्यंत पोहोचून त्यांच्याकडील लोकसाहित्याचे धन उकलण्याचा प्रयत्न करून ते नव्या पिढीपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे:**

१) मौखिक असलेल्या डांगी लोकसाहित्याला अक्षरबद्ध करणे.

२) डांगी लोकसाहित्यातून प्रकट होणारी संस्कृती व इतिहास यांचा अभ्यास करणे.

३) भाषाशास्त्र व समाजशास्त्राच्या अभ्यासाला पूरक सामग्री म्हणून डांगी लोकसाहित्याचे संकलन व संपादन करणे.

४) डांगच्या इतिहासात जमा होणाऱ्या या अमूल्य डांगी लोकसाहित्याची दखल घेऊन त्यांना चीरकालीत्व देणे गरजेचे आहे.

५) लोकरंजनाच्या दृष्टीने डांगी लोकसाहित्य कुठल्याही बाबतीत मागे नाही, म्हणून लोकरंजनासाठी डांगी लोकसाहित्य उपलब्ध करून देणे.

६) डांगी लोकसाहित्याला समाजातील मुख्य प्रवाहात आणणे.

७) डांगी बोली ही गुजरातीची की मराठीची असा वाद पूर्वीपासून पाहायला मिळतो. तो वाद पडताळून पाहणे व डांगी बोलीचे स्थान निश्चित करणे.

**संशोधनाची व्याप्ती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये डांग जिल्ह्यातील लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, आहाणे, वाक्प्रचार, लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा, लोकविद्या, लोकसमज, रूढी, परंपरा, इत्यादी मौखिक लोकसाहित्य प्रकारांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास केला जाणार आहे. ही या संशोधनाची व्याप्ती असून खालीलप्रमाणे संशोधनाची मर्यादा असणार आहे.

**संशोधनाच्या मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा सध्याच्या डांग जिल्ह्यापुरताच मर्यादित असून त्याच भौगोलिक क्षेत्रातील डांगी बोलीभाषेत प्रचलित असलेल्या मौखिक लोकसाहित्याचा अभ्यास केला जाणार आहे. या डांगी लोकसाहित्याच्या माध्यमातून डांगी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास केला जाणार आहे. मात्र येथे नागरी किंवा शहरी जनतेच्या लोकसाहित्याचा आणि बोलीचा विचार केला जाणार नाही. ही या संशोधन विषयाची मर्यादा निश्चित केली आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे:**

१) संशोधन क्षेत्राची पाहणी व सीमा निश्चित करणे.

२) संशोधन क्षेत्रातील डांगी लोकसाहित्याचे संकलन करणे.

३) संकलनातील अडचणींची नोंद घेणे व त्या अडचणी दूर करणे.

४) डांगी लोकसाहित्याचे वर्गीकरण व विश्लेषण करणे.

५) अभ्यासांती निष्कर्षांची मांडणी करणे.

**गृहीतके:**

१) डांगची आदिवासी प्रजा गरीब व अशिक्षित असल्याने त्यांचा विकास झाला नाही, पर्यायाने ते प्रसारमाध्यमांपासून दूर राहिले.

२) डांगी आदिवासींचा स्वातंत्र्योत्तर काळात अधिक विकास झाला.

३) डांगी संस्कृती इतर संस्कृतींपेक्षा वेगळी आहे.

४) डांगच्या सीमा प्रदेशातील मराठी आणि गुजराती भाषांचा प्रभाव डांगी बोलीवर जाणवतो.

५) डांगी बोलीत प्रमाण मराठीपेक्षा आणि प्रमाण गुजरातीपेक्षा वेगळेपणा आढळून येतो.

**प्रकरण रचना**

**प्रकरण पहिले: अ) विषय प्रवेश ब) डांग: भौगोलिक परिसर**

प्रस्तुत शोध प्रबंधात प्रामुख्याने सात प्रकरणांची योजना केलेली असून पहिल्या प्रकरणातून संशोधकाने विषय निवडीमागील भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या संशोधनातून कोणकोणती उद्दिष्टे सध्या केली जाणार आहेत?, त्याची समाजोपयोगीता काय? त्याचबरोबर संशोधनाची मर्यादा व व्याप्ती स्पष्ट केलेली असून पूर्वसंशोधनाचा आढावाही घेण्यात आला आहे. या संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धती व तंत्रे स्पष्ट केली आहेत. डांग जिल्ह्याचा संबंध परिचयही याच प्रकरणात करून देण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे: लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप**

दुसऱ्या प्रकरणाच्या माध्यमातून संशोधकाने लोकसाहित्याच्या विविध संज्ञा, संकल्पना समजून घेतल्या आहेत. विविध अभ्यासकांची मते जाणून घेऊन पुढच्या अभ्यासाची भक्कम बाजू तयार केली आहे. यातून विविध अभ्यासक-संशोधकांनी मांडलेले सिद्धांत, निर्माण केलेल्या संज्ञा व संकल्पना, विविध अभ्यास पद्धती, एकमेकांवर केलेले आरोप प्रत्यारोप, त्यातून निघालेले निष्कर्ष या सगळ्यांचा धांडोळा घेत घेत संशोधक पुढे गेला आहे.

**प्रकरण तिसरे: डांग जिल्ह्यातील लोककथा**

खऱ्या अर्थाने संशोधन कार्य तिसऱ्या प्रकरणापासून सुरु झालेले असून यामध्ये अनेक लोककथांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये देवकणसराची लोककथा, देवटाफरा आणि निळपसौर यांची लोककथा, धनसऱ्या आणि कनसऱ्याची लोककथा, होली आणि होलाची लोककथा, जळींतकाराची लोककथा, सतरपती पाटलाची लोककथा या प्रमुख लोककथांचा येथे विचार केला गेला आहे. या लोककथांतून डांगी आदिवासींच्या भावभावनांचे प्रकटन सहज झालेले दिसून येते. वेगवेगळ्या कल्पना, निर्माण केलेली वेगवेगळी प्रतीके यांचा मोठा भरणा या लोककथांतून दिसून येतो. पृथ्वीबरोबर मानवाची, इतर प्राण्यांची, कीटकांची कशी निर्मिती झाली? त्याला कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या? या सगळ्यांचा धांडोळा या लोककथा घेतांना दिसतात.

**प्रकरण चौथे: डांग जिल्ह्यातील लोकगीते**

चौथ्या प्रकरणातून लोकगीतांचा अभ्यास करण्यात आला आहे. ही लोकगीते डांग जिल्ह्यातील आणि डांगी बोली बोलणाऱ्या व्यक्तींकडून जरी गायली जात असली तरी ती अस्सल मराठी वळणाची आहेत असे ही लोकगीते ऐकल्यानंतर लक्षात येते. अर्थात ही लोकगीते समजून

घेण्यासाठी, त्यांचा योग्यतो अर्थ लावण्यासाठी डांग जिल्ह्यातील लोकसंस्कृती आधी समजून घेतली पाहिजे. तरच ह्या लोकगीतांचा नीट अर्थ लागू शकतो. परिसरातील अनेक घटना प्रसंग या लोककथा आणि लोकगीतांतून गुंफलेले असतात. येथील आदिवासी स्त्रियांच्या भावभावनांच्या नाजूक छटा यातून उमलतांना दिसतात. स्त्रियांच्या लोकगीतांतून संसारिक घटना प्रसंग, कोमल भाव, दुःख, आपुलकी, सहानुभूती, जगण्याची जिद्द, जबाबदारी दिसून येते. तर पुरुषांच्या लोकगीतांतून परिसरातील स्थळ महात्म्य, गायी-गुरांना दिलेले देवत्व दिसून येते.

**प्रकरण पाचवे: डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार**

पाचवे प्रकरण डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांच्यावर आधारित असून त्यातून कधी विनोद तर कधी जीवनातील सत्य मार्मिक आणि मोजक्या शब्दात दिग्दर्शित केलेले दिसते. यातून कधी कधी अतिशयोक्तीही झालेली दिसून येते. ही अतिशयोक्ती बहुतेकदा हास्यविनोद निर्माण करण्यासाठी योजलेली युक्ती असते. म्हणी किंवा वाक्प्रचार आकाराने लहान असले तरी त्यात जीवनातील मोठे सत्य उलगडण्याची ताकद असते. ही ताकद माणसाला जीवन जगण्यासाठी प्रेरणा देते. गत जीवनात घडलेल्या अनेक घटनांचा त्यात साठलेला अनुभवांश असतो. हा अनुभवांश येणाऱ्या पिढीला प्रेरणा देत त्यांचे जीवन समृद्ध करत असतो. प्रस्तुत प्रकरणातील विविध म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांचे आकलन केले असता आपल्याला त्याची सत्यता पटते.

**प्रकरण सहावे: डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या**

सहावे प्रकरण हे लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्यावर आधारित असून त्यातून डांग जिल्ह्यात प्रचलित असलेल्या त्या त्या घटकानुसार अनेक लोकसमजुती नमूद केलेल्या आहेत. डांगी आदिवासी अनेक लोकसमजुतींना आपलेसे करून त्यातून आपले जीवन समृद्ध करू पाहात आहे. या लोकसमजुतींच्या आधारे आपल्या जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातून आपल्याला सुख, समाधान लाभेल अशी आशा त्यांच्या ठिकाणी दिसून येते. या सगळ्या लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्या मागे भीती आणि आशा दडलेल्या आहेत. भीती याच्यासाठी की, आपल्या जीविताला काही बाधा पोहोचू नये. आणि आशा याच्यासाठी की, आपले जीवित कार्य सफल, समृद्ध आणि समाधानकारक रीतीने व्यतीत व्हावे. थोडक्यात आपल्याला सुख प्राप्त व्हावे ही आशा या लोकसमजुतींच्या मागे असलेली दिसून येते.

**प्रकरण सातवे: डांग जिल्ह्यातील बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास**

सातवे प्रकरण हे डांगी बोलीवर अवलंबून असून त्यातून डांग जिल्ह्यात बोलली जाणारी डांगी बोली कशी आहे? तिचे स्वरूप काय? तिच्यावर कोणकोणत्या बोली-भाषांचा प्रभाव आहे? तिच्या अंतर्गत बोलींचे स्वरूप काय? आणि कसे आहे? त्या संदर्भात विविध अभ्यासकांचे मत काय? या सगळ्यांचा धांडोळ ग्रिअर्सनपासून आतापर्यंत वेगवेगळ्या घटकांना अनुसरून घेण्यात आला आहे. यातून समग्र डांगी बोलीचे आकलन होईल अशी आशा आहे.

**प्रकरण आठवे: उपसंहार व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात उपसंहाराबरोबर प्रत्येक प्रकरणाचे स्वतंत्र निष्कर्ष दिले आहेत. हे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**निष्कर्ष:**

**प्रकरण पहिले: अ) विषय प्रवेश  ब) डांग: भौगोलिक परिसर**

- ‘डांग’ शब्दाच्या अर्थाचा विचार करता अनेक कोशकारांचे मत वरवर पाहता वेगवेगळे वाटत असले तरी सगळ्यांचा मतितार्थ मात्र एकच असून ‘डांग’ म्हणजेच जंगलयुक्त प्रदेश, डोंगर टेकड्यांचा प्रदेश होय.
- डांग जिल्ह्यात बागायती शेती आढळत नाही. कारण, संबंध डांग जिल्हा डोंगराळ प्रदेश असून जंगलाने परिपूर्ण भरलेला आहे. शिवाय नदीचे पाणी मोठ्या धरणाच्या रुपात कुठेही अडवलेले नाही. परिणामी पावसाचे सगळे पाणी वाहून जाते. त्यामुळे सिंचन व्यवस्था कुठेही दिसत नाही. येथील आदिवासी पारंपरिक पद्धतीने शेती करतात.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींसाठी नद्या उदरनिर्वाहाचे साधन बनून राहिल्या आहेत. असे असले तरी नदीची पातळी दिवसेंदिवस घटत चालली असून ही त्यांच्यासाठी चिंतेची गोष्ट आहे.
- आजही रामायण, महाभारत काळातील इतिहासाच्या पाऊलखुणा शबरीधाम, पंपा सरोवर, अंजन कुंड, पांडव गुफा इत्यादी पौराणिक स्थळांच्या सहाय्याने दाखवून देता येतात.
- डांगमधील जाती-जमातीनुसार त्यांच्या बोलीत, राहणीत, व्यवहारात, वेशभूषेत, केशभूषेत, घरांच्या रचनेत, व्यवसायांत, रीतीरीवाजांत, एकूणच सगळ्या सांस्कृतिक जीवन व्यवहारात

थोडेफार फरक असल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रत्येक जमातीची स्वतःची काही खास वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

- डांग जिल्ह्यातील अनेक जमातींपैकी 'भिल्ल' ही जमात वैशिष्ट्यपूर्ण असून या जमातीचे डांग जिल्ह्यावर असलेले प्राबल्य पौराणिक काळापासून दिसून येते.
- डांग जिल्हा भिल्ल, कोकणा (कुंकणा/कुणबी/कोकणी), वारली, गामित/गावित या प्रमुख जमातींबरोबरच चोधरा/चोधरी, दुबळा, मावची, विटोलिया/कोटवाळा, धोडिया, नायक, नायका अशा अनेक जमातींनी बनलेला जिल्हा आहे. डांग जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासींचे प्रमाण ९३ टक्के इतके आहे. यावरून डांग जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा आहे असे सिद्ध होते.
- डांगी आदिवासी हे निसर्गोपासक असल्याचे त्यांच्या राहणीमानावरून, जीवनसरणीवरून, विचारसरणीवरून, विधीविधानांवरून, आहार-विहारावरून लक्षात येते.
- डांगी आदिवासींमध्ये अनौपचारिक शिक्षण पद्धतीची प्राचीन परंपरा पाहायला मिळते. हे आपल्याला शिकारीचे कौशल्य, शेतीचे कौशल्य, बांबू किंवा लाकडापासून बनवल्या जाणाऱ्या विविध वस्तू, घरांची बांधणी किंवा दुरुस्ती, लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, वनौषधींचे ज्ञान इत्यादींच्या सहाय्याने दाखवून देता येते.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींसाठी जंगलाचे महत्त्व अनन्यसाधारण असून जंगलावरच त्यांचे भरणपोषण अवलंबून आहे.

**प्रकरण दुसरे: लोकसाहित्य: संकल्पना व स्वरूप**

- लोकसाहित्याचे बीज भाषाभ्यासातून अंकुरले असे म्हणावे लागते.
- लोकसाहित्य बहुआयामी असून अनेक शास्त्रांना उपयोगी ठरत असल्याचे दिसून येते. उदा. इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादी.
- लोकसाहित्याची एकच एक व्याख्या दिसून येत नाही.
- लोकसाहित्याची सर्वसमावेशक, परिपूर्ण अशी व्याख्या अजून तरी कोणाला करता आल्याचे दिसत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे लोकसाहित्याची अतिव्याप्ती होय.

- बहुतेकदा लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यात अभ्यासकांची, संशोधकांची घालमेल झालेली दिसून येते. यामुळेच काही अभ्यासक, संशोधक लोकसाहित्याला लोकसंस्कृती म्हणतात तर काही अभ्यासक, संशोधक लोकसंस्कृतीला लोकसाहित्य म्हणतात.
- लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन असले तरी काहीवेळा लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्या सीमा एकमेकांत विलीन झालेल्या दिसून येतात.
- भारतात लोकसाहित्याची परंपरा प्राचीन असली तरी शास्त्रोक्त पद्धतीने लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन पाश्चात्यांनीच केले.
- लोकसाहित्याच्या लिखित खुणा वेदवाङ्मयात सापडतात. हा लिखित वाङ्मयाचा सर्वात प्राचीन पुरावा आहे.
- इंग्रजीतील 'Folk" या शब्दासाठी 'लोक' हा मराठीत शब्द वापरला जात असून त्याचा अर्थ आर्येतर समाज असा होतो.
- लोकसाहित्यातील 'लोककथा' आणि 'लोकगीत' या संज्ञा सर्वप्रथम कै. वि. का. राजवाडे यांनी उधृत केल्या.

**प्रकरण तिसरे: डांग जिल्ह्यातील लोककथा**

- लोककथांनी समाजाच्या प्रबोधनाचे आणि करमणुकीचे महत्त्वाचे कार्य आजतागायत केले आहे. याला अपवाद डांग जिल्ह्यातील लोककथाही नाहीत असे दिसून आले आहे.
- थिओडोर बेनफे यांच्या 'भारतमूलक सिद्धांता'नुसार (Indianist Theory) भारत हा लोककथांचा जनक ठरतो.
- लोककथांचे निर्मितीनंतर भ्रमण सुरु होते, ह्या लोककथांचे ज्या ज्या प्रदेशात भ्रमण होते त्या त्या प्रदेशातील संस्कृतीप्रमाणे त्यांच्यात परिवर्तन होत असते. त्यामुळेच एकच कथा वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या रुपात ऐकायला मिळते.
- लोककथा ही अनौपचारिक शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम असून तिच्याद्वारे समाज संघटीत राहण्यास मदत होते.
- लोककथांच्या माध्यमातून लोकांच्या इच्छा-आकांक्षा, समाजाची जीवनमूल्य प्रकट केली जातात.

- डांगच्या लोककथांतून समाज जीवनाचे दर्शन घडते. तसेच साहचर्य, नीती, धैर्य, व्यवहारचातुर्य, बंधुभाव, आपुलकी इत्यादी मूल्यांचे दर्शन घडते.
- कल्पनाबंध हा डांगच्या लोककथेचा महत्त्वाचा घटक असून एकाच लोककथेत अनेक कल्पनाबंध आढळून येतात.
- पशु-पक्ष्यांचे माणसात रुपांतर, कुणब्याला भविष्य सांगणारा पोपट, देवकणसराचे मुलीतून शेतीत आणि शेतीतून मुलीत होणारे रुपांतर असे अनेक कल्पनाबंध डांग जिल्ह्यातील लोककथेत आढळतात.
- पुण्य मिळविण्यासाठी, अशुभ निवारणासाठी, मनोकामना पूर्ण करण्यासाठी, बाळ-बाळंतीनीला सुख संपदा लाभण्यासाठी, मृतात्म्याला शांती लाभण्यासाठी, मनोरंजनासाठी तसेच प्रबोधनासाठी डांग जिल्ह्यात लोककथा सांगितल्या आणि ऐकल्या जातात.
- डांगच्या लोककथेतून भाबडेपणा, श्रद्धा, निष्ठा, चतुराई, द्वेष, मत्सर, प्रेम या भावभावनांचे क्षणोक्षणी दर्शन होते.
- ‘सतरपती पाटील’ या लोककथेच्या माध्यमातून असे सांगता येते की, मृत्यू ही अटळ घटना असून त्याला कोणीही टाळू शकत नाही.
- शेतीविषयक अनोखी कल्पना प्रस्तुत लोककथांतून पाहायला मिळते. मका हे त्यातील प्रमुख पिक असल्याचे दाखवले आहे.
- विविध विधीप्रसंगी दारूला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असले तरी दारू ही कोणत्याही माणसाला खरे बोलायला भाग पाडते. हे प्रस्तुत प्रकरणातील लोककथांच्या माध्यमातून दाखवून देता येते.
- प्रस्तुत प्रकरणातील लोककथांचा विचार करता या लोककथांमध्ये हास्य, विनोद, अद्भुत, रहस्य, बोध, पराक्रम, अनुभव, उत्पत्ती यांचे प्रकर्षाने दर्शन होते. यावरून असे म्हणता येते की, प्रस्तुत प्रकरणातील लोककथा अनेक लोककथाप्रकारांना स्पर्शून जातात.
- डांगी आदिवासींना सोन्या-चांदीचे भारी आकर्षण असल्याचे त्याच्या लोककथांवरून दिसून येते. उदा. सोनान्या खुर्च्या, चांदीन्या खुर्च्या, चांदीना रोड, सोनाना रोड, सोनिया घडा, सोनिया चुंबळ, सोन्या दरवाजा (योनीद्वार), सोनपूर, सोनाय देवळी, सोनावती या प्रत्येक नावातून सोन्या-चांदीचे नाव उल्लेखित होते.

- डांगच्या लोककथांतून परस्त्री संबंध उत्कटतेने प्रदर्शित केला जातो. उदाहरणार्थ महादेव आणि सोनावतीचे मिलन, निळूपांडव आणि मुरुदेवकन्येचे मिलन, हेमलीन गावतीन आणि काकऱ्या पारधीचे मिलन.
- प्रसुतीचे वर्णन, मासिक पाळीचे वर्णन, परस्त्रीसंगाचे वर्णन लोककथेतून वेळोवेळी येत असले तरी त्यातून अश्लीलतेचा भाव प्रकट होत नाही. हे येथील लोककथांचे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.
- मासिक पाळीचा प्रसंग असेल, प्रसुतीचा प्रसंग असेल किंवा पाचवीचा प्रसंग असेल या सर्वांचे बारकावे प्रस्तुत लोककथांतून टिपलेले दिसून येतात.
- एकाच मूळ लोककथेत अनेक स्वतंत्र उपकथा गुंफलेल्या असतात असे दिसून आले आहे. उदाहरणार्थ सावाय राणीच्या केसांपासून तेरुली मुंगीचा जन्म, सुईणीने फेकलेल्या घुगऱ्यांपासून कोतीची निर्मिती इत्यादी. यातून कथकाची स्वतंत्र शैली प्रदर्शित होते.
- प्रस्तुत लोककथा कधी देवांना असामान्य देवत्व प्रदान करतात तर कधी जनमानसाच्या पातळीवर आणून सोडतात.
- नावे धारण करण्याची एक अनोखी रीत येथील लोककथांतून दिसून येते. उदाहरणार्थ वनस्पतीचे नाव म्हणून वनसापती, पळसाचे वन म्हणून पळसवन, रसोडा (स्वयंपाक) बनविणारा म्हणून रसोड्यादेव इत्यादी.
- लोककथेत परिवर्तन घडवून आणण्यास कथकाची कथनशैली किंवा निवेदनशैली महत्त्वाचे कार्य करते.
- डांगच्या लोककथांतून निसर्गातील अनेक घटकांचे वर्णन केलेले असते. या घटकांच्या माध्यमातून आदरयुक्त, भीतीयुक्त, आश्चर्यकारक, कल्पनातीत स्वाभाविक चित्रण केलेले दिसून येते.
- येथील लोककथांमधून स्थानिक परिसराची माहिती प्रभावीपणे चित्रित केलेली दिसून येते. लोकांच्या प्रचलित समजुती, चालीरीती, गुणदोष, ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिसर यांचा चांगला परिचय करून दिलेला दिसून येतो.
- पृथ्वीच्या निर्मितीची कथा आणि मानव निर्मितीची कथा म्हणून ‘जळींतकार’ या लोककथेकडे पाहता येते.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींच्या दैनंदिन जीवन व्यवहारातील अनेक घटना प्रसंग येथील लोककथांतून गुंफलेले दिसून येतात.

**प्रकरण चौथे: डांग जिल्ह्यातील लोकगीते**

- डांग जिल्ह्यातील लोकगीतांना मौखिक परंपरा असून त्यांना सामाजिक संदर्भ लाभलेला आहे.
- डांग जिल्ह्याची समग्र लोकसंस्कृती लोकगीतांतून व्यतीत झालेली दिसून येते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांमधून लोकदेवतांचा व लोकपरंपरांचा परिचय होतो.
- पुराण वाङ्मयाचा डांगी लोकगीतांवर प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यांच्या लोकगीतांतून वेळोवेळी रामायण महाभारतकालीन संदर्भ उल्लेखिक होतात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समाजाची जीवनविषयक चिंतनशीलता व्यक्त होते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून आजूबाजूच्या भूप्रदेशाचे यथोचित वर्णन आलेले दिसते.
- पारंपरिक लोकजीवनाचे विशेष त्यांच्या लोकगीतांतून पहावयास मिळतात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समूहमनाला प्राधान्य दिलेले असते. एकटी व्यक्ती कधीच गात नाही. तर ती समूहाला सोबत घेऊनच गात असते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांचा विचार करता, पुरुष लोकगीतांपेक्षा स्त्री लोकगीतांचा वाटा अधिक आहे असे दिसत असले तरी स्त्री आणि पुरुष दोघांचीही लोकगीते आपापल्या जागी श्रेष्ठ दर्जा टिकवून आहेत.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून समाजाचे प्रभावीपणे दर्शन होते. समाजाच्या आशा आकांक्षा प्रदर्शित होतात. इतिहासाच्या पाऊलखुणाही त्यातून उमटलेल्या दिसतात.
- डांग जिल्ह्यातील विवाहविषयक लोकगीतांतून वधू-वरांवर भावी सांसारिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे संस्कार केले जातात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून अनेक भावभावनांचे पदर उलगडून पाहता येतात.
- काही लोकगीतांतून अतिशयोक्ती झालेली दिसून येते. उदा. पितळी वळया, रुप्याचा वासा इत्यादी. अशा अतिशयोक्तीतून त्यांच्या कल्पकतेची चांगली जाणीव होते.
- डांग जिल्ह्यात स्त्री आणि पुरुष यांची स्वतंत्र लोकगीते पाहायला मिळतात. म्हणजेच स्त्रियांच्या लोकगीतांमध्ये पुरुष किंवा पुरुषांच्या लोकगीतांमध्ये स्त्रिया कधीही सहभागी होत नाहीत.
- डांग जिल्ह्यातील इतर लोकसाहित्य प्रकारांहून लोकगीत या लोकसाहित्य प्रकारावर मराठीचा सर्वाधिक प्रभाव असल्याचे दिसून आले आहे.

- डांग जिल्ह्यात डांगी बोली बोलली जात असली तरी लोकगीते बहुतेकदा मराठीतूनच गायली जातात.
- डांग जिल्ह्यात डांगी बोलीतून लोकगीते गायली जात नसल्याचे आढळून आले आहे.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांतून परिसरातील विविध घटना स्थळांचे परिणामकारक व महत्त्वपूर्ण चित्रण केलेले दिसून येते.
- पुरुष लोकगीतांपेक्षा स्त्री लोकगीतांतून सांसारिक विषय अधिक परिणामकारकरीत्या हाताळलेले दिसून येतात.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांना धार्मिकतेची सौम्य झालर लावलेली दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या लोकगीतांतून वेळोवेळी देवीदेवतांची, धार्मिक स्थळांची, पवित्र स्थानांची किंवा वस्तूंची चर्चा व वर्णन केलेले दिसते.
- डांग जिल्ह्यातील लोकगीतांवर बदलत्या काळानुसार अनेक घटना प्रसंगांचे परिणाम झाल्याचे दिसून येते. येथील लोकगीतांवर आधुनिकतेचा सौम्य थर चढलेला दिसून येतो.

**प्रकरण पाचवे: डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे, वाक्प्रचार**

- म्हणी आणि उखाणे यांच्या प्राचीनतम पाऊलखुणा वेद वाङ्मयात सापडतात. यावरून म्हणी आणि उखाणे वेदांच्या आधीही जनमानसात प्रचलित होते असे म्हणता येते.
- म्हणी अनुभवाधारित असल्याने त्या एकाच वेळी अनेक स्थळी सारख्याच आशय घेऊन निर्माण होतात. यावरून म्हणींची सार्वत्रिकता मान्य करावी लागते.
- म्हणीतील लघुता, सत्यता, सूक्ष्मता, तीक्ष्णता, व्यावहारिकता, लोकमान्यता आणि चटकदारपणा हे गुण सर्वांनीच मान्य केले असले तरी आतापर्यंत सर्वसमावेशक अशी म्हणीची व्याख्या कोणालाही करता आलेली नाही.
- म्हण ही कोणत्यातरी एकाच व्यक्तीची निर्मिती असते, परंतु अनुभवाची पातळी एकच किंवा सारखीच असल्याने ती म्हण जनमानसात फिरता फिरता गुळगुळीत होऊन तिच्यावरचे निर्मात्याचे नाव खोडले जाते. आणि ती म्हण जनांची, लोकांची होऊन बसते.
- डांग जिल्ह्यातील म्हणींवर मराठीबरोबरच इतरही भाषांतील म्हणींचा प्रभाव दिसून येतो.
- डांग जिल्ह्यातील म्हणींमध्ये गुजराती भाषेतील शब्दांपेक्षा मराठी भाषेतील शब्दांचा अधिक भरणा आहे. त्याचवेळी त्या डांगी बोलीचे वेगळेपणही स्पष्टपणे दर्शवितात.

- डांगी म्हणींचे डांगीकरण झालेले दिसून येते. मात्र डांगी लोकगीतांचे डांगीकरण अजूनही झालेले नाही. म्हणजेच डांगी म्हणींची भाषा डांगी असली तरी डांगी लोकगीतांची भाषा मराठीच आहे.
- डांगी आदिवासींचे मूळ आणि कुळ महाराष्ट्रातील असल्याने अजूनही त्यांच्यावर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.
- ही संस्कृती मुळची महाराष्ट्राची असून इतिहासात महाराष्ट्राने त्यांच्यावर केलेला अन्याय अपराधीपणाचा आहे.
- डांग जिल्ह्यातील म्हणींतून सत्यता, चांगुलपणा, अतिशयोक्ती, गरिबी, कौटुंबिकता, आळशीपणा इत्यादींशी निगडीत म्हणी आढळून येतात.
- डांग जिल्ह्यातील म्हणी आणि उख्याण्यांमध्ये प्राणी, पक्षी, कीटक, झाडे, नदी, डोंगर, सूर्य, चंद्र इत्यादी पत्रांचा वावर दिसून येतो.
- डांग जिल्ह्यातील उखाण्यांमध्ये नाव घेण्याचे उखाणे सापडत नाहीत. ही प्रथा प्रामुख्याने महाराष्ट्रातच दिसून येते.
- दीर्घ स्वरूपाचे उखाणे डांग जिल्ह्यात आढळून येत नाहीत. अगदी दोन ते तीन कडव्यांत हे उखाणे पूर्ण केले जातात.
- डांग जिल्ह्यातील उखाणे प्रामुख्याने प्रश्न स्वरूपाचे असून त्याचे उत्तर देणे अपेक्षित असते. त्याशिवाय उखाणा पूर्णत्वास जात नाही. ज्यात प्रश्न नाही, कूट नाही, उत्तराची अपेक्षा नाही असा एकही उखाणा मला डांग जिल्ह्यात सापडला नाही.
- म्हणी, उखाणे तसेच वाक्प्रचार यांच्या आधारे डांग जिल्ह्यातील आदिवासींच्या संस्कृतीचे दर्शन होते.
- डांग जिल्ह्यातील आदिवासी आपल्या बोलण्यात वाक्प्रचारांचा यशस्वीपणे वापर करतात.
- वाक्प्रचाराच्या संदर्भात कोणत्याही एकाच हेतूने किंवा उद्देशाने वाक्प्रचाराचे वर्गीकरण करणे कठीण असून एकच वाक्प्रचार अनेक वर्गीकरण प्रकारामध्ये बसू शकतो.

**प्रकरण सहावे: डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या**

- प्रत्येक सण कोणत्या ना कोणत्या प्रथेशी, श्रद्धेशी संबंध राखून असल्याचे दिसून आले आहे. उदा. होळी सणाला अश्लील शब्दांचे वर्णन करणे, पोळयाला बैलांची पूजा करणे, अखात्रीला (अक्षयतृतीया) पूर्वजांची पूजा करणे इत्यादी.
- डांग जिल्ह्यातील आदिवासींचा मृत्यूनंतरच्या जीवनावर दृढ विश्वास आहे. उदा. अक्षयतृतीयेची किंवा सर्वपित्री अमावस्येची पूर्वजपूजा, पिंडदानाच्या वेळी कावळयाच्या रुपात पूर्वज येणे, पुनर्जन्म, अतृप्त आत्म्याचे भटकणे इत्यादी.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पना परस्परपूरक आहेत.
- लोकप्रथा आणि लोकविद्या या संकल्पना लोकभ्रम आणि लोकश्रद्धा यांच्याहून व्यापक आहेत.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पना अतिशय गुंतागुंतीच्या असून त्यांना एकमेकींपासून वेगळे करता येत नाही.
- एखादा लोकभ्रम किंवा लोकश्रद्धा ठरवितांना त्या त्या समाजाच्या विचारसरणीचा अभ्यास करावा लागतो.
- लोकभ्रम आणि लोकश्रद्धा यांची भिन्न कालखंडात अदलाबदल होऊ शकते.
- लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या या संकल्पनांवर डांग आणि डांगच्या परिसरातील आदिवासींचा दृढ विश्वास असल्याचे दिसून आले आहे.
- लोकप्रथांत एकाचवेळी स्थिरता आणि परिवर्तन असे द्वंद्वात्मक धोरण दिसून येते. उदा. होळीचा सण. यातील दहन क्रिया सर्वत्र स्थिर असून अश्लीलतेत परिवर्तन होतांना दिसते.
- लोकप्रथेचे पालन आणि परिवर्तन वैयक्तिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर घडून येते.
- लोकप्रथा सतत परिवर्तनशील असून तिच्यात इतिहासातील अनेक खुणा चिकटून असतात.
- डांग जिल्ह्यातील लोकप्रथा, लोकभ्रम आणि लोकश्रद्धा या भीतीपोटी निर्माण झालेल्या आहेत. तर काही वेळा सुफलनाच्या आशेपोटीही निर्माण झालेल्या दिसतात.
- डांगमधील लोकभ्रमांना जनमान्यता प्राप्त झाल्याने ते समाजात आजही टिकून आहेत.

- डांगच्या आदिवासींचे मन भयमुक्त होत नाही तोपर्यंत लोकप्रथा, लोकभ्रम आणि लोकश्रद्धा समाजात टिकून राहतील.
- डांगमधील आदिवासी लोकप्रथांमागे किंवा लोकभ्रमांमागे असलेल्या कार्यकारणभावाची शहानिशा न करताच अनुकरण करत असल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच ते अनुकरणप्रिय आहेत. परंतु याचा परिणाम म्हणून बऱ्याच लोकप्रथांमागे किंवा लोकभ्रमांमागे असलेल्या कारणांचा लोप होत आहे.
- डांगमधील आदिवासींचा रुपांतरावर विश्वास आहे. उदा. चेटकिणीचे (भुताळीचे) मांजरीत रुपांतर, चेटकिणीचे घुबडात रुपांतर, देवी-देवतांचे; भूतांचे; गुरुचे अंगात संचारणे, मृत व्यक्तीचे भूतात रुपांतर, मृतात्म्याचे कावळ्यात रुपांतर, पुनर्जन्म इत्यादी.
- प्रत्येक समस्येचे समाधान किंवा कोणत्याही रोगाचे निदान आणि उपचार भगताकडे असते असा येथील आदिवासींचा समज आहे.
- धन-धान्याचे महत्त्व ओळखून कोणत्याही धान्याची नासाडी न करणे हे परंपरेने मिळालेले ज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे.
- डांगी आदिवासींच्या प्रथा, परंपरा, समजुती, भ्रम, श्रद्धा, अंधश्रद्धा, विद्या, तंत्र, मंत्र यांच्या मुळाशी जीवन सुखावह होण्यासाठी चाललेली धडपड दिसते. जीवन सुखमय व्हावे, जीवन सुरळीत चालावे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ नये हाच हेतू या सगळ्या विधींमागे दिसून येतो.
- डांगमध्ये अनेक प्रकारचे विधी करून स्वतःला आणि संपूर्ण गावाला सुरक्षित केले जाते. मात्र हे सुरक्षाकवच कालांतराने क्षीण होते. त्यामुळे विशिष्ट काळानंतर पुन्हा तेच ते विधी करावे लागतात. हा काळ वार्षिक असू शकतो किंवा दैनिकही असू शकतो. उदा. वार्षिक विधींमध्ये विविध सण-उत्सवांचा विचार करता येतो. तर दैनिक विधींमध्ये दृष्ट उतरणे वगैरेंचा विचार करता येतो.

**प्रकरण सातवे: डांग जिल्ह्यातील बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास**

- मराठी माणसाच्या उदासीनतेमुळे डांगी बोलीचे गुजरातीकरण होतांना दिसत आहे.
- डांगी बोलीकडे मराठी अभ्यासक, संशोधकांनी दुर्लक्ष केल्याने डांगी बोलीभाषक महाराष्ट्रापासून दूर गेले.

- खानदेशी किंवा अहिराणी बोलीविषयी मराठी माणसाने जेवढी आपुलकी दाखवली तेवढी डांगी बोलीविषयी दाखवली नाही.
- मराठी माणसाने डांगी बोलीविषयी आज माघार घेतलेली आहे. म्हणजेच डांगी बोलीविषयी मराठी माणसाकडून किंवा महाराष्ट्र शासनाकडून आज तरी कोणत्याही प्रकारचे सकारात्मक प्रयत्न होतांना दिसत नाही.
- डांग जिल्ह्यातील बोली मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांना जवळची आहे हे निर्विवाद. परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती ही की, भविष्यात डांगी बोलीवरचा मराठी भाषेचा प्रभाव कमी होत जाईल. त्या ठिकाणी गुजराती भाषेचा प्रभाव वाढलेला दिसेल. येणाऱ्या पिढीमध्ये त्याच्या पाऊलखुणा आताच दिसायला लागल्या आहेत.
- सध्याच्या स्थितीत साठहून अधिक वयाने असलेल्या डांगी माणसांच्या मनामध्ये मराठी भाषेबद्दल थोडीशी आपुलकी असलेली दिसून येते. मात्र नवीन पिढीमध्ये मराठी भाषेबद्दलची आपुलकी दिसून येत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन पिढीला मिळणारे गुजराती माध्यमाचे शैक्षणिक वातावरण.
- डांग जिल्ह्यातून मराठी शिकणाऱ्यांची संख्या सध्या नाहीच्या बरोबर आहे. गुजराती शिकणाऱ्यांची संख्या शंभर टक्केच्या जवळपास आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे डांग जिल्ह्यात आज मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध नाही.
- डांगी बोलीचा पहिला लिखित पुरावा ग्रिअर्सनच्या 'Linguistic Survey of India' च्या माध्यमातून १९०७ नंतरचा मिळतो. डांग प्रदेशाचा उल्लेख रामायण-महाभारतात दंडकारण्य म्हणून केला गेला असला तरी डांगी बोलीविषयी तत्कालीन कोणताही लिखित पुरावा उपलब्ध होत नाही.
- डांगी बोलीवर कोणत्याही एका भाषेचा किंवा बोलीचा प्रभाव आहे असे म्हणता येत नाही.
- डांगी बोली ही मराठी, गुजराती या भाषांबरोबरच अहिराणी, कोकणी, भिल्ली, वारली, गामीत इत्यादी बोलींचे मिश्रण आहे असे म्हणता येते.
- महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगत असलेल्या डांग प्रदेशावर मराठी भाषेचा प्रभाव असल्याचे स्पष्टपणे दिसते. मात्र डांग जिल्ह्याच्या केंद्रस्थानाकडे जातांना मराठी भाषेचा प्रभाव कमी कमी होत गेल्याचे दिसून येते. डांग जिल्ह्याच्या केंद्रस्थानाकडून गुजरात राज्याच्या दिशेने म्हणजेच उत्तरेकडे जात असतांना गुजराती भाषेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

**परिशिष्ट - संदर्भ सूची**

**१. मराठी संदर्भ ग्रंथ:**

१. आपटे वा. गो., मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, वरदा प्रकाशन-पुणे, पुनर्मुद्रण: डिसेंबर २०१६

२. कापडणीस शं. क., बागलाण इतिहास दर्शन, प्रकाशन काळ: फेब्रुवारी १९९९

३. कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: १० जानेवारी २००७

४. काळे एस. एस.(प्र. संपा.), आदिवासी साहित्य, आर्हत पब्लिकेशन आणि आर्हत जर्नल-बदलापूर, आवृत्ती: २९ जानेवारी २०१८

५. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स-पुणे, प्रथमावृत्ती: ऑक्टोबर २००९

६. गारे गोविंद- संपा., आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २०१०

७. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, तृतीयावृत्ती: २०१२

८. गारे गोविंद, वारली चित्र संस्कृती, श्रीविद्या प्रकाशन-पुणे, चतुर्थ आवृत्ती: जानेवारी २०१६

९. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल: ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, (आवृत्तीचा उल्लेख नाही)

१०. चोरघडे वामन कृष्ण, साहित्याचे मूलधन, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस-मुंबई, प्रथमावृत्ती: १९३८

११. जंगम मेघा बाळासाहेब, निफाड तालुक्यातील लोकसंस्कृती, प्रथमावृत्ती: १९ एप्रिल २०१३
१२. जाखडे अरुण (संपा.), भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: महाराष्ट्र, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १७ ऑगस्ट २०१३
१३. जोशी वसंत स. (संपा.), भाषा व साहित्य: संशोधन-खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद-पुणे, द्वितीयावृत्ती: सप्टेंबर २००६
१४. ढेरे रा. चिं., लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रकाशनदिन: महाशिवरात्र-१२ मार्च २००२
१५. तायडे पुरुषोत्तम सदानंद (अभ्यासक), वऱ्हाडी आणि अहिराणी बोलींमधील म्हणींचा तौलनिक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, जून २०१९
१६. दांडेकर मालती, लोकसाहित्याचें लेणें, श्रीज्ञानेश्वर प्रेस-कोल्हापूर, आवृत्ती: १९५२
१७. दाभोलकर नरेंद्र, तिमिरातुनी तेजाकडे: समग्र अंधश्रद्धा निर्मुलन व पुढे, राजहंस प्रकाशन-पुणे, आवृत्ती आठवी: सप्टेंबर २०१८
१८. दाभोलकर नरेन्द्र, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन-पुणे, (प्रकाशन वर्ष नमूद नाही)
१९. दास बाळासाहेब, हिरडे बाबूराव (संपा.), मराठी साहित्यसंशोधन: दृष्टी आणि दृष्टीकोन, स्नेहवर्धन प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ३१ मे २०१७
२०. दीक्षित सदाशिव, कर्मयोगी नानासाहेब दीक्षित यांचे चरित्र-डांगचा सिंह, प्रकाशन दि. २८ मे १९८८ रोजी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शुभहस्ते
२१. देवगांवकर एस. जी., देवगांवकर सौ. शैलजा, पाच आदिवासी जमाती, श्री साईनाथ प्रकाशन-नागपूर, प्रथमावृत्ती: १५ जाने. २०१८

२२. देवरे रमेश कृ. (संपा.), लोकसाहित्य दर्शन, कर्मवीर प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ७ जुलै २००९

२३. देशपांडे कमलाबाई, अपौरुषेय वाङ्मय, मनोहर ग्रंथमाला-प्रकाशन ५२ वे, आवृत्ती: १९४८

२४. देशपांडे दीपा, महानुभावीय लोकसाहित्य

२५. धारणकर सरल, दादासाहेब बिडकर वसा: आदिवासी सेवेचा, राजहंस प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: मार्च २०१२

२६. नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स- कोल्हापूर, आवृत्ती: २९ ऑगस्ट २०१३

२७. पाटील अजय अशोक, सिंधू संस्कृती: भारतीय इतिहासातील एक सोनेरी पान, अथर्व पब्लिकेशन्स्-धुळे, प्रथमावृत्ती: सप्टेंबर २०१७

२८. पाटील राहुल (संपा.), संशोधन मुद्रा, स्नेहवर्धन प्रकाशन- पुणे, प्रथमावृत्ती: १ जानेवारी २०१६

२९. बाबर सरोजिनी (संपा.), नादब्रह्म-महाराष्ट्र लोकसाहित्यमाला पुष्प ३० वे, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, प्रथमावृत्ती: १९९५

३०. भवाळकर तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २५ डिसेंबर १९८९

३१. भवाळकर तारा, लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा, स्नेहवर्धन प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १ जुलै २००९

३२. भागवत दुर्गा आणि खानापूरकर द. पु., डांगच्या लोककथा-भाग १, वरदा बुक्स-पुणे, प्रथमावृत्ती: १ ऑगस्ट १९९२

३३. भागवत दुर्गा आणि खानापूरकर द. पु., डांगच्या लोककथा-भाग ३, वरदा बुक्स-पुणे, पहिली आवृत्ती: १५ मे १९९२

३४. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७

३५. भोसले द. ता., लोकसंस्कृती: बंध-अनुबंध, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: १ जानेवारी २०१०

३६. भोसले द. ता., लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २७ मे २००४

३७. भोसले द. ता., संस्कृतीच्या पाऊलखुणा, पद्मगंधा प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: २६ मार्च २००१

३८. महाराष्ट्र लोकसाहित्य माला-पुष्प चौथे, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती-पुणे, प्रथमावृत्ती: १९६०

३९. मांडे प्रभाकर, आदिवासींचे धर्मांतर: एक समस्या, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: २००३

४०. मांडे प्रभाकर, लोकमानस आणि लोकाचार, गोदावरी प्रकाशन-अहमदनगर, प्रकाशन दिनांक: जानेवारी २०१८

४१. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, द्वितीयावृत्ती: फेब्रुवारी १९९७

४२. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००

४३. राजपूत भगवान, पालघर जिल्हा आदिवासी समाज: लोकजीवन व लोकसाहित्य, अथर्व पब्लिकेशन्स-धुळे, प्रथमावृत्ती: २०१७

४४. राजवाडे वि. का., भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास, लोकवाङ्मय गृह-मुंबई, बारावी आवृत्ती: ऑगस्ट २०११

४५. रोंगटे तुकाराम, आदिवासी आयकॉन्स, संस्कृती प्रकाशन-पुणे, प्रथमावृत्ती: ४ एप्रिल २०११

४६. लांजेवार लता, वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य: स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: ११ एप्रिल २००३

४७. वाकोडे मधुकर (संपा.), मराठी लोककथा, साहित्य अकादेमी-नवी दिल्ली, दुसरे पुनर्मुद्रण: २००६

४८. वाकोडे मधुकर आणि करोगल सुषमा (संपा.), मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादेमी-नवी दिल्ली, प्रथमावृत्ती: २००१, पृ. ९५-९६

४९. शिंदे पंडित, कृषीसंस्कृतीमधील लोकवाङ्मय, चिन्मय प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती: नोव्हेंबर २०११

५०. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य: संशोधन आणि समीक्षा, कैलाश पब्लिकेशन्स-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: मार्च २०१३

५१. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा- भाग दुसरा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस-पुणे, प्रथमावृत्ती: १५ ऑगस्ट २००६

५२. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा- भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस- पुणे, प्रथमावृत्ती: २६ जानेवारी १९९८

५३. सावे खंडेराव (अनु. पाटील मीना), वारली: समाजशास्त्रीय अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २००७

५४. सोनार विजया, आदिवासी कोकणांच्या कथा, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: २४ डिसेंबर २०००

**२. गुजराती संदर्भ ग्रंथः**

१. चौधरी प्रभु आर., डांगी लग्नगीतो एक अभ्यास, पार्श्व पब्लिकेशन- अमदावाद, प्रथमावृत्ती: २०१२
२. चौधरी प्रभु आर., दस डांगी लोककथाओ, पार्श्व पब्लिकेशन-अमदावाद, प्रथमावृत्ती: २०१०
३. देवी गणेश (संपा.), भारतीय भाषा लोक सर्वेक्षण: गुजरात, दीव-दमण अने दादरा-नगर हवेलीनी भाषा, ग्रंथ ९ भाग ३, ओरिएन्ट ब्लैकस्वॉन प्राईवेट लिमिटेड-नवी दिल्ली, प्रथम संस्करण २०१६
४. पवार पुंडलिक सी., डांगी लोककथाओ (समज अने समीक्षा), आशिष पब्लिकेशन- आणंद (गुजरात), प्रथम आवृत्ती:२००६
५. पवार पुंडलिक सी., डांगी लोकगीतो (एक स्वाध्याय), आशिष पब्लिकेशन्स- आणंद (गुजरात), प्रथम आवृत्ती: २००६
६. पवार पुंडलिक, डांगी लोकसाहित्यविमर्श, गुरु डिझाईन शोप-आणंद-गुजरात, प्रथमावृत्ती: २०१३
७. वाढू डाह्याभाई, कुंकणा कथाओ: संकलन अने गुजराती अनुवाद, आदिवासी भाषा साहित्य प्रकल्प, प्रथम संस्करण: २०००

**३. हिंदी संदर्भ ग्रंथ:**

१. कपूर बदरीनाथ- संपा., लोकभारती हिन्दी मुहावरे और लोकोक्ति कोश, लोकभारती प्रकाशन-इलाहाबाद, तृतीय संस्करण: २००५
२. कुमार कमलेश, आदिवासी विमर्श: अवधारणा और आंदोलन, तेज प्रकाशन-नई दिल्ली, पहला संस्करण: २०१४
३. नरवणे विश्वनाथ दिनकर (संपा.), भारतीय कहावत संग्रह (Proverbs of India), त्रिवेणी संगम-भाषा विभाग-पुणे, प्रथमावृत्ती: जानेवारी १९७८

४. सहल कन्हैयालाल, राजस्थानी कहावतें एक अध्ययन, (पुस्तकाची पाने गहाळ झाल्याने प्रकाशन व आवृत्ती देता आली नाही.)

**४. मराठी वाङ्मय कोश:**

१. अग्निहोत्री द. ह. (संपा.), अभिनव मराठी-मराठी शब्दकोश भाग चौथा, व्हीनस प्रकाशन-पुणे

२. आपटे वा.गो., अनमोल मराठी शब्दरत्नाकर, अनमोल प्रकाशन-पुणे, आवृत्ती: २००५

३. जोशी पं. महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, तिसरा खंड, प्रोफिशंट पब्लिशिंग हाउस-पुणे, आवृत्ती: मार्च २०१०

४. जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र. संपा.), मराठी विश्वकोश खंड-६, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ-मुंबई, प्रथम प्रकाशन: १९७७

५. झांबरे स. ध. (संपा.), साकेत मराठी-मराठी शब्दकोश, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, नवीन आवृत्ती: २०१०

६. झांबरे स. ध., साकेत मराठी म्हणी आणि वाक्प्रचार कोश, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, नवी आवृत्ती: २०१६

**५. नियतकालिके:**

१. जोशी अरुणा (संपा.), ढोल, मराठी वार्षिकांक; डिसेंबर २००३, भाषा संशोधन-प्रकाशन केंद्र-वडोदरा

२. महाजन वंदना (प्र. संपा.), आदिवासींसमोरील सामाजिक आणि सांस्कृतिक पेच (विशेषांक), आमची श्रीवाणी, जून-सप्टेंबर २०१९

**६. संदर्भ लिंक:**

१. https://cdn.s3waas.gov.in/s3d7a728a67d909e714c0774e22cb806f2/uploads/2018/06/2018062982.pdf (दिनांक: २०/०९/२०२१)

२. https://censusindia.gov.in/2011census/dchb/DCHB_A/24/2422_PART_A_DCHB_THE%20DANGS.pdf (दिनांक: ९ सप्टेंबर २०२१, पृ. ६२)
३. https://dangs.gujarat.gov.in (दि. १०/१२/२०१६)
४. https://dsaluchicagoedu.translate.goog/books/lsi/?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=ajax,nv,sc,elem (दिनांक: ७ सप्टेंबर २०२१)
५. https://mr.m.wikipedia.org (दि. ३१/०१/२०१७)
६. https://mr.wikipedia.org/wiki/घुबड, (दिनांक: ६ जुलै २०२१)
७. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/174921 (दिनांक: ८ सप्टेंबर २०२१)
८. https://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/59517 (दिनांक: २० सप्टेंबर २०२१)
९. www.odcities.org/shabarikumbh... (दि. २८/०१/२०१७)

**७. संदर्भ व्यक्ती:**

१. आंबिबेन रामुभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
२. आदित्यभाई रामदासभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
३. आनंदभाई रामजीभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
४. ईशाकभाई कनुभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
५. कला प्रकाश भोये, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग
६. कल्याणीबेन मनस्याभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग
७. काकड राम वाडेकर, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक
८. कुसुमबेन शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग
९. केथुबेन बाळूभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

१०. गंगा आनाजी ठाकरे, मु. बरमेवड पो. घोट्यामाळ ता. आहवा जि. डांग

११. गंगाभाई भावडूभाई पवार, मु. शिवारीमाळ पो. चिखली ता. वघई जि. डांग

१२. गंगाराम काळीराम चौऱ्या, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१३. गणेश जी. चौधरी, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१४. गुलाब येवाजी ठाकरे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१५. गोविंद पांडू भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

१६. चंदर सोळे, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

१७. जयाबेन बुधनभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

१८. जिज्ञेशभाई मनस्याभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग

१९. दिलीपभाई रतन गांगुर्डे, मु. नवागाव पो. सापुतारा ता. आहवा जि. डांग

२०. पांडू खंडू वाघेरा, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२१. पुन्याभाई लासुभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

२२. पूजाबेन अनिलभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

२३. प्रमिला रमन भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

२४. प्रविणभाई यशवंतभाई सहारे, मु. पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग

२५. प्रवीण सखाराम कहांडोळे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२६. फुलसिंगभाई एल. पवार, मु. निरगुडमाळ पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

२७. बंसू पांड्या गांगुर्डे, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२८. बिपीन गुलाब ठाकरे, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

२९. बीबी देवराम भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

३०. बुधनभाई लासुभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

३१. मनाज खिराडे, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

३२. मिराबेन कनुभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

३३. मोहना पाऊज्या भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

३४. यशवंत आर. गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक

३५. यशोदा सिताराम ठाकरे, मु. कुंडाणे (क) पो. अभोणा ता. कळवण जि. नाशिक

३६. याकुबभाई शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

३७. रंजना रतन बागुल, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

३८. रखमी गोविंद भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

३९. रविनाबेन राजूभाई पवार, मु. लहानचर्या पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग

४०. रामू काकड वाडेकर, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

४१. रोशनभाई संपतभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

४२. लक्षू गंगाराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

४३. लक्षू बनशा वाघेरा, मु. भुरापाणी पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

४४. लखनभाई मुकेशभाई बागुल, मु. धुमखल पो. जाखाना ता. आहवा जि. डांग

४५. लीला सोन्या पवार, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग

४६. विदिशाबेन मंछीरामभाई भोये, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

४७. विलास निलेश देशमुख, मु. शिवारीमाळ पो. चिखली ता. वघई जि. डांग

४८. संतुभाई मोतीरामभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग

४९. सरिताबेन पुन्याभाई कवर, मु. गायखास पो. बोरखल ता. आहवा जि. डांग

५०. सरिताबेन सुरेशभाई पवार, मु. लहानचर्या पो. गलकुंड ता. आहवा जि. डांग

५१. सलमनभाई शांतारामभाई वाघमारे, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

५२. सिताबेन बुद्याभाई चौधरी, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

५३. सिताराम काशिराम पवार, मु. चिरापाडा पो. सामगहाण ता. आहवा जि. डांग

५४. सिताराम महादू ठाकरे, मु. कुंडाणे (क) पो. अभोणा ता. कळवण जि. नाशिक

५५. सितुबेन बबनभाई गवळी, मु. खिरमानी पो. बारखांद्या ता. वघई जि. डांग

५६. सुभासभाई मोतीरामभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग

५७. सुमन यशवंत गायकवाड, मु. पासोडीपाडा पो. बोरगाव ता. सुरगाणा जि. नाशिक

५८. सुलभाज खिराडे, मु. रांजूणे पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

५९. सोनीबेन सुक्करभाई पवार, मु. बारीपाडा पो. नडगचोंड ता. आहवा जि. डांग

६०. सोनीबेन चंद्राभाई पालवे, मु. खिरमानी पो. बारखांद्या ता. वघई जि. डांग

६१. सोमीबेन संतुभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग

६२. सोमीबेन सितारामभाई गवळी, मु. खिरमानी पो. बारखांद्या, ता. वघई जि. डांग

६३. हौशी केवज्या भरसट, मु. खडकवहळी पो. लिंगा ता. आहवा जि. डांग


संशोधक

**गायकवाड गिरीष यशवंत**

एम. ए., नेट (जे.आर.एफ.), सेट

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर**

प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, फॅकल्टी ऑफ आर्टस्

महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा